# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

(स्थानिक गुन्हे शाखा, सातारा)

दुरध्वनी क्रमांक- ०२१६२-२३३९२३ वेबसाईट www.satarapolice.gov.in

मेल आय डी - pilcb.satara@mahapolice.gov.in


## प्रेसनोट

दिनांक १४/०२/२०२६

(स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांची कारवाई.)

( व्यक्तीच्या जिवीतास धोका किंवा आरोग्यास गंभीर इजा होवू शकते असे MEPHENTERMINE SULPHATE INJECTION अवैधरित्या विक्री करणाऱ्या इसमास ताब्यात घेवून १,५४,०८०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त. )

श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी सातारा जिल्हयातील अंमली पदार्थ विक्री, खरेदी, कब्जात बाळगणारे इसमांची माहिती प्राप्त करुन त्यांचेवर प्रभावीपणे कायदेशीर कारवाई करण्याच्या सुचना पोलीस निरीक्षक अरुण देवकर, स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना दिल्या आहेत.

श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा, व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक सातारा यांनी दिले सुचनेप्रमाणे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांचे अधिपत्याखाली तपास पथक तयार करुन त्यांना अंमली पदार्थ विक्री, खरेदी, कब्जात बाळगणारे इसमांचेवर कारवाई करण्याचे आदेश दिले.

दिनांक १३/०२/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक अरुण देवकर, स्थानिक गुन्हे शाखा सातारा यांना त्यांचे बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, इसम नामे शिवराज पंकज कणसे, रा.अजिंक्य बझार चौक, शाहुनगर, गोडोली, सातारा हा MEPHENTERMINE SULPHATE INJECTION हे इंजेक्शन खरेदीची पावती नसताना तसेच विक्री अगर कब्जात बाळगण्याचा परवाना नसताना इंजेक्शन घेणाऱ्या व्यक्तीच्या जिवीतास धोका किंवा आरोग्यास गंभीर इजा होवू शकते याची जाणीव असताना अशा इंजेक्शनच्या बाटल्यांची बेकायदेशीर विक्री करीत असून तो शाहू चौक ते चारभिंती जाणारे रोडवर त्याची यामाहा मोटार सायकल क्रमांक MH-11-CX-6070 सह ग्राहकांच्या शोधामध्ये फिरत असून त्याने अंगामध्ये चॉकलेटी रंगाची हुडी व काळया रंगाची ट्रॅक पॅन्ट परिधान केलेली आहे अशी माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे व रोहित फार्णे यांना प्राप्त माहितीमधील इसमास ताब्यात घेवून कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे पथकाने शाहू चौक ते चारभिंती जाणारे रोडचे कॉर्नवरील एक बंद पत्र्याचे टपरी जवळ सापळा लावुन थांबलो असता प्राप्त माहितीमधील वर्णनाशी मिळता जुळता असणारा इसम यामाहा मोटार सायकल क्रमांक MH-11-CX-6070 वरुन चारभिंतीकडुन येताना दिसल्याने त्यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात MEPHENTERMINE SULPHATE INJECTION IP असे नाव असलेल्या TERMIVA ब्रॅन्ड इंजेक्शनच्या १३ बाटल्या मिळून आल्या, त्यास इंजेक्शन खरेदीचे बील आहे ? तसेच सदर इंजेक्शन खरेदीकरीता डॉक्टरांची चिठ्ठी आहे काय ? व इंजेक्शन कब्जात बाळगण्याचा अगर विक्री करण्याचा परवाना आहे काय असे विचारले असता त्याने नसल्याचे सांगीतले. तसेच सदरच्या इंजेक्शनचा वापर कशाकरीता करता असे विचारले असता त्याने इंजेक्शनचे खरेदी बील, डॉक्टरांची चिठ्ठी, तसेच इंजेक्शन कब्जात बाळण्याचा अगर विक्री करण्याचा परवाना नसून इंजेक्शनचा वापर बॉडी बिल्डींगकरीता अवैधरित्या करीत असल्याचे सांगीतले. तसेच MEPHENTERMINE SULPHATE INJECTION हे इंजेक्शन प्रती बाटली २०००/- रुपये प्रमाणे विक्री करीत असल्याचे सांगीतले तसेच त्याचे कब्जात ४०८०/- रुपये किमतीची इंजेक्शन १,००,०००/- रुपये किमतीची मोटार सायकल व ५०,०००/- रुपये किमतीचा आयफोन असा एकूण १,५४,०८०/- रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आल्याने ताब्यात घेवून त्याचे विरुध्द सातारा शहर पोलीस ठाणे गु.र.नं.११८/२०२६ भा.न्या.सं.क.१२३, १२५, २७८ अन्वये नोंद केला आहे.

श्री.तुषार दोशी, पोलीस अधीक्षक सातारा व श्रीमती डॉ.वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अरुण देवकर, सहायक पोलीस निरीक्षक रमेश गर्जे, रोहित फार्णे, पो.उ.नि. विश्वास शिंगाडे, पारीतोष दातीर, पोलीस अंमलदार आतिश घाडगे, संतोष सपकाळ, विजय कांबळे, संजय शिर्के, शरद बेबले, लैलेश फडतरे, लक्ष्मण जगधने, प्रविण फडतरे, स्वप्नील शिंदे, अरुण पाटील, गणेश कापरे, अविनाश चव्हाण, अमित सपकाळ, स्वप्नील कुंभार, अमित माने, ओंकार यादव, मोहन पवार, विशाल पवार, पृथ्वीराज जाधव, रोहित निकम, सचिन ससाणे, रविराज वर्णेकर यांनी सदरची कामगिरी केली आहे.

---

(मा.पोलीस अधीक्षक, सातारा यांचे मान्यतेने)

**प्रति,**

**सर्व संपादक,**

**---------------------**